MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३४२ | मंगळवार दि.०३ सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -342 | TUESDAY DT.03 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4



बीड : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरानजीक माळावरील शेतात बैलपोळा सणानिमित्त सर्जा-राजाचे पूजन केले. याप्रसंगी डॉ.दीपाताई क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर आदींची उपस्थिती होती.

# राष्ट्रपतींच्या दौऱ्यासाठी ६०० बसचं नियोजन, पण एसटी कामगारांचा संप

लातूर : ऐन गणेशोत्सवात एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. एसटी कामगार संयुक्त कृती समितीच्या वतीने आजपासून बेमुदत धरणे आंदोलनाला बसले आहेत. आज डढ कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा पहिला दिवस आहे. लातूरमध्ये ३९६ पैकी ३४६ फेऱ्या रद्द करण्यात आल्याने प्रवाशांची चांगलीच गैरसोय झाल्याचे दिसून आले. तर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दौऱ्यानिमित्त सहाशे बसेस आरक्षित करण्यात आल्या होत्या. आता बसेसच्या नियोजनाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

लातूर विभागात पाच बस आगार आहेत. यात एकूण ५६४ बसच्या फेऱ्या होत असतात.



## लातूर प्रशासनाची उडाली धांदल

दररोज किमान २ हजार ७५० च्या फेऱ्या होत असतात. संपूर्ण जिल्ह्यात दररोज ५० लाख रुपयांचा उलाढाल होत असते. मात्र सकाळच्या पहिल्या सत्रात अनेक बस निघाल्या होत्या. त्यानंतर संप सुरू झाला. ३९६ पैकी ३४६ फेऱ्या रद्द झाल्या आहेत. १९ हजार १९७ किमी अंतरावर बसेस धावल्याच नाहीत. संप किती काळ चालेल याबाबत अनिश्चितता असल्यामुळे राष्ट्रपती दौऱ्यासाठी नियोजित बस सेवेचं काय होईल? याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

राष्ट्रपतींच्या दौऱ्यासाठी ६०० बसचं नियोजन

लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे बुधवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत बुद्ध विहाराचे उद्घाटन होणार आहे. शिवाय विविध शासकीय योजनेतील महिला लाभार्थ्यांचाही कार्यक्रम होणार आहे. याकरिता तब्बल ६०० बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. बुद्ध विहार उद्घाटनानंतर उदगीर येथील उदयगिरी हायस्कूलच्या मैदानावर महिला सक्षमीकरणाचा कार्यक्रम होणार आहे. याकरिता जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून महिला दाखल होणार असल्याने बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

संपामुळे लातूर प्रशासनाची धांदल


लातूर विभागातील १३०, नांदेडमधील २७०, परभणी येथील १५० तर यवतमाळ येथील ५० बसेस लातूर विभागात आज संध्याकाळी दाखल होणार आहे.

## मा. आ. साहेबरावजी दरेकर (नाना) यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा - शिवभूषण जाधव

आष्टी (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार गटाचे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे माजी आमदार साहेबरावजी दरेकर (नाना) यांचा अभिष्टचिंतन सोहळा मंगळवार दिनांक ०३/०९/२०२४ रोजी दुपारी १२:३० वाजता आष्टी तालुक्यातील अंबिका लॉन्स नगर-जामखेड रोड शेरी बु. कडा येथे साजरा होणार असून आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार गटाचे पाटोदा तालुका अध्यक्ष शिवभूषण जाधव यांनी केले आहे.

आष्टी तालुक्यातील माजी आमदार साहेबरावजी दरेकर (नाना) यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास प्रमुख उपस्थिती मा. खा. बजरंग बप्पा सोनवणे लोकसभा सदस्य बीड, मा. खा. निलेशजी लंके साहेब लोकसभा सदस्य नगर दक्षिण, मा. आ. रोहित दादा पवार विधानसभा सदस्य कर्जत जामखेड, मा. आ. संदीप भैया क्षिरसागर विधानसभा सदस्य बीड, मा.महबूब भाई शेख युवक प्रदेशाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार असून आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवभूषण जाधव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पाटोदा तालुका अध्यक्ष यांनी केले आहे.



## गेवराई शहरात बैल पोळा सण उत्साहात साजरा




### शिवराज पवार यांनी वेशीवर बांधलेले तोरण तोडून बैल पोळा फोडला

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई शहरात बैल पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. युवा नेते शिवराज बाळराजे पवार पाटील यांनी हनुमान मंदिराला प्रदक्षिणा घालून ,वेशीवर फुलांच्या माळांनी बांधलेले तोरण तोडून पोळा फोडला. शहरातील शेतकर्यांनी वेशीतून सजवलेल्या बैलांना वाजतगाजत मिरवून आणले. दोन दिवसापासून पावसाची संततधार सुरू असल्याने, पोळा सणाच्या उत्साहात भर पडल्याचे दिसून आले.पोळा पहाण्यासाठी नागरीकांनी गर्दी केली होती. सोमवार ता. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता गेवराई शहरातील शेतकरी, दरवर्षी प्रमाणे शास्त्री चौकात पोळा सण साजरा करण्यासाठी एकत्र आले होते. गेवराई चे पाटील शिवराज बाळराजे पवार यांनी सजवलेल्या बैलांची मिरवणूक काढून ग्रामदैवतांची पुजा केली. त्यांनी वेशीवर बांधलेले तोरण तोडून बैल पोळा फोडला. त्यानंतर, शेतकर्यांनी सजवलेल्या बैलांची वेशीतून मिरवणूक काढली. ढोल ताशा , हलगीच्या तालाने शास्त्री चौकातला परिसर दणाणून गेला. गेल्या दोन दिवसांपासून गेवराई तालुक्यात संततधार पाऊस पडत असून, पोळा उत्साहात पार पडल्याचे चित्र दिसून आले. नागरीकांनी पोळा पाहण्यासाठी गर्दी केली होती. पोलिस निरीक्षक प्रविणकुमार बांगर, पोलिस अधिकारी संतोष जंजाळ, डॉ. भुतेकर , यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांची तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



रामगिरी महाराज यांनी जे पैगम्बंर बदल अपशब्द बोल्ला त्याचा समर्थकात नितेश राणे ने अजुन अपशब्द भाषा वापरल्याने मुस्लिम समाजाच्या भावना दुखवल्या त्या बदल नितेश राणे वर कटोर कारवाई करन्यात यावी या साठी आज दिनांक २/९/२०२४/ पेठ बीड पोलीस स्टेशन मधे निवेदन देनेयात आले निवेदन देताना शिवसेना अल्पसंख्यक जिल्हाप्रमुख सय्यद नय्युम भाई शिवसेना माजि शहर प्रमुख नसीर खान माजि शहर संघटक सलीम भाई ज़मीर भाई शारोक भाई गणेश ढोरमारे सगीर भाई नवीद ईनामदार सीराज दादा मुजु भैयम्या असलम भाई मोसीन भाई अनवर भाई रेहान मुला



# बीड जिल्ह्याच्या राजकारणातील भीष्मपितामह - माजी आ. साहेबराव दरेकर (नाना)

आष्टी (प्रतिनिधी)

मतदार संघाच्या राजकारणात व समाजकारणात गेली ४० वर्षांपासून जनतेचे प्रश्न सोडविणारे, आष्टीच्या राजकीय कुरुक्षेत्रातील भीष्मपितामह माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांचा अभिष्टचिंतन सोहळा मंगळवार दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न होत असून त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा राजेंद्र लाड यांनी घेतलेला आढावा.

बीड जिल्ह्याच्या राजकीय नकाशावर आपल्या आगळ्यावेगळ्या व्यक्तिमत्वाने नावलौकिक निर्माण केलेले राजकीय नेते साहेबराव दरेकर नाना आहेत. बीड जिल्ह्याच्या तमाम जनतेच्या व राजकिय नेत्यांच्या ते परिचयाचे आहेत. आपल्या शैक्षणिक, सामाजिक, राजकिय, धार्मिक कार्याने त्यांनी बीडच्या राजकीय पटलावर आपली वेगळी ओळख निर्माण केलेली आहे तथा बीडच्या राजकिय नकाशावर आपल्या राजकिय कर्तबगारीने त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केलेले नेते दरेकर नाना आहेत.

त्यांच्या स्पष्टोक्ते पणामुळे ते सर्व दूर परिचयाचे आहेत. मराठवाड्यातील संत - महंतांच्या आणि शुरवीरांच्या भूमीत माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांच्या रूपाने ही आष्टीची माती पवित्र झाली. संत भगवान बाबा, संत वामन भाऊ, माऊली महाराज, मुकुंदराज स्वामी, प्रभू श्रीराम यांच्या पावन भूमीत राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक आदी क्षेत्रात आपल्या कार्याने या मातीत लहानाचे मोठे होऊन या भूमीच पांग फेडण्याचे काम करणारे नेते दरेकर नाना आहेत.

आष्टी पासून चाळीस किलोमीटर अंतरावर असणाऱ्या कोयाळ या छोट्याशा गावात स्वातंत्र्य सेनानी स्वर्गीय नाथूजी दरेकर यांच्या कुटुंबात ३ सप्टेंबर १९४७ रोजी म्हणजे देश स्वतंत्र झाल्यावर अगदी काही दिवसात माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांचा जन्म झाला. शेतकरी आणि सामान्य कुटुंबात लहानाचे मोठे होताना अंगी सामाजिक गुण होते. पुढे शिक्षण पूर्ण करत असतांनाच कोयाळ व परिसरामधील गावातील जनतेच्या सुख - दुःखात सहभागी होणे, त्यांच्या अडीअडचणी सोडवणे हा छंद लहानपणापासूनच असल्याने ते आपोआप राजकारणात ओढले गेले. तेंव्हापासून ते आजपर्यंतचा त्यांचा राजकिय अनुभव आणि इतिहास पाहता ते आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या राजकारणात नेहमी केंद्रस्थानी असतात. त्यांच्याकडे आष्टीच्या राजकिय कुरुक्षेत्रावरील भीष्मपितामह म्हणून पाहिले जाते.

माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांची राजकारणाची सुरुवात पिंपळा जिल्हा परिषद गटातून झाली. अशाप्रकारे बीड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राजकारणात त्यांनी यशस्वी प्रवेश केला. कडा सहकारी साखर कारखान्याला बळ देणारा संयम आणि संघर्षातून माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या खांद्याला खांदा देऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी काम करणारा रांगडा नेता म्हणजे नाना. त्यावेळी मा. आ. भीमराव धोंडे साहेब कारखान्याचे चेअरमन झाले त्यावेळी नाना व्हाईस चेअरमन पदावर विराजमान झाले. पुन्हा साधारणपणे १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत धोंडे साहेबांनी उभे राहण्याचा निर्णय घेतला आणि इथूनच अतिशय जवळच्या दोन्ही मित्रात दोन गट पडले आणि दरेकरांचा खरा संघर्षाचा काळ सुरू झाला. पुढे १९९० च्या विधानसभा निवडणुकीत धोंडे - दरेकर आमने - सामने आले. जनता दलाचे चक्र सुदर्शन चक्र झाले. मात्र दरेकर नानांचा पराभव झाला. नंतर १९९५ ची निवडणूक सुरू झाली. घोडा मैदान समोरच होते. या निवडणुकीत दरेकर नानांचा मुलगा - मुलगी चिन्हाने विक्रमी मते घेऊन मराठवाड्यातील क्रमांक एकचे मते घेत दहावी शिकलेला संघर्षशील नेता विधानसभेत पोहोचला. त्याच काळात युती सरकार सत्तेवर आले. मात्र दरेकर नानांची शरद पवार साहेब यांच्यावरची निश्चिम भक्तीमुळे दरेकरांना अपक्ष असून देखील मंत्रिमंडळापासून दूर राहावे लागले. मात्र त्यावेळी आमदार दरेकर नाना यांनी मतदारसंघातील अनेक साठवण तलाव, बीड - अमळनेर नगर राज्य मार्ग, आयटीआय कॉलेज



यांसह अनेक छोटे - मोठे विकास कामे मार्गी लावून मतदार संघात शांतता अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न केले. पुढे मित्र स्वर्गीय रामचंद्र दादा धस यांचे चिरंजीव सुरेश आण्णा धस यांना राजकारणात मनमोकळ्या पणाने कुठलाही हातचा न ठेवता मदत केली. १९९७ च्या जि. प. निवडणुकीत आमदार सुरेश धस या युवा नेतृत्वाचा राजकीय उदय झाला आणि त्यांना दरेकरांनी जि. प. अध्यक्षपदासाठी मदत केली. पुढे १९९९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत आपले राजकिय शिष्य असणाऱ्या आमदार सुरेश धस यांच्याकडून दरेकरांना पराभूत व्हावे लागले. नंतर २००४ च्या विधानसभा निवडणुकीत ज्येष्ठ चिरंजीव राजाभाऊ दरेकर यांना उभे केले मात्र तेथे अपयश आले. दरेकरांच्या राजकिय जीवनात अनेक चढउतार आले. मात्र पिंपळा सध्याच्या लोणी जिल्हा परिषद गटातील जनतेने मात्र दरेकर कुटुंबावर नेहमीच भरभरून प्रेम केले आहे. पुढे पुन्हा २००९ च्या विधानसभा निवडणुकीत दरेकरांनी आमदार सुरेश धस यांना मदत केली तेथे त्यांचा विजय झाला. मात्र येथे एकत्र असलेली थ्रीडी जास्त काळ एकत्र राहिली नाही. पुन्हा २०१४ च्या निवडणुकीत आमदार भीमराव धोंडे यांना आमदार करण्यासाठी मदतीचा हात दिला आणि ते आमदार झाले. पुढे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत सध्याचे आमदार बाळासाहेब आजबे राष्ट्रवादीकडून एकाएकी लढत असतांना माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी त्यांना मदत करण्याचा निर्णय घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. एकूणच आष्टी मतदार संघाच्या राजकिय इतिहासात माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांनी आमदार होण्यासाठी मदत केली नाही असा सध्या तरी एकही नेता नाही. आजच्या बदलत्या राजकिय परिस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्याबरोबर निष्ठेने कायम राहणार असल्याचे ठामपणे सांगितले आणि पक्ष विस्तार करण्यासाठी प्रत्यक्ष सुरुवात केलेली आहे.दिलेला शब्द पाळणे, जे बोलायचे तोंडावर बोलणे, स्वाभिमानी बाणा आणि संघर्ष करण्याची तयारी असणारे व आजच्या मतदारसंघातील जनतेच्या सुखदुःखात सहभागी होणारे बीड जिल्ह्यात सर्वत्र परिचित असणारे आष्टी मतदार संघाचे भीष्मपितामह ज्येष्ठ नेते माजी आमदार साहेबराव दरेकर नाना. चंदन स्वतः झिजत राहते आणि दुसऱ्याला शितलता देते तसे नानांचे जीवन आहे. जगद्गुरु संत तुकारामांच्या विचारांचा प्रभाव नानांच्या बोलण्यात नेहमीच जाणवतो. त्यांच्या स्वभावाला धार्मिक अधिष्ठान आहे. समाजातील रुढी - परंपरा, सण - उत्सव याला बाधा न पोहोचू देता ते अंधश्रद्धेला विरोध करतांना दिसतात. लग्न समारंभातील बडेजाव पणा, पूजाअर्चा, वृत्त - वैकल्य यामध्ये समाजाने गुंतून न पडता, व्यर्थ खर्च न करता आपल्या कुटुंबाची उन्नती करावी असे नेहमी त्यांना वाटते. शेतकऱ्यांचा पिंड असलेले, शेतकऱ्यांबद्दल त्यांना नेहमीच कळकळ वाटते. शेतकऱ्यांच्या मुलांनी शिकावं, मोठं व्हावं, नावलौकिक करावा याबाबत नाना नेहमीच आशावादी राहिले. नाना नेहमी वधूवरांना लग्नसमारंभात शुभाशीर्वाद देतांना तरुणांना वडीलकीचा सल्ला दिल्याशिवाय राहत नाहीत. नाना आमदार असतांना त्यांच्या काळात झालेले रस्ते, पाझर तलाव, नाले, पूल आजही नानांच्या दूरदृष्टीची साथ देतात. सत्तेत असो अथवा नसो, पदावर असो अथवा नसो परंतु समाजकारण करतांना त्यांनी विधानसभा मतदारसंघात नेहमीच आपला धबधबा कायम टिकून ठेवला आहे. गोरगरीब मजूर, पीडित - शोषित सर्वांचा आधार म्हणजे नाना. कुणाची भीडभाड न ठेवणारे, परखड बोलणं, बोलण्यातील लकप, चालण्यातील रुबाब, स्वभावातील रांगडेपणा नेहमीच भावत गेला. नानांशी बोलण्यावर आपलेपणाची भावना मनातून निर्माण होते. नानांचा संपर्क आला की, नाना त्यांना आपलंसं करतात. नेहमी दिलखुलास असणारे नाना, आपलेपणाची विचारपूस करणारे नाना, दरेकर नाना परखड राजकारणी. आष्टी मतदारसंघातच नव्हे तर महाराष्ट्र राज्य सुद्धा त्यांना नाना म्हणूनच ओळखतो.

अशा या सर्व गुणसंपन्न बीड जिल्ह्याच्या राजकारणातील भीष्मपितामह माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांना वाढदिवसानिमित्त दीर्घायुष्यासाठी अनंत शुभेच्छा...!!!

- प्रासंगिक लेख -
**राजेंद्र लाड**
आष्टी
९४२३१७०८८५




# पत्रकारिता क्षेत्रातील अस्थिरता ....! आधारस्तंभाला भक्कम आधाराची गरज ....!

आपल्या भारत देशाच्या लोकशाहीचे प्रामुख्याने चार आधारस्तंभ सांगितले व मानले जातात. यात पहिला आधारस्तंभ संसद म्हणजेच कायदेमंडळ, दुसरा सरकार म्हणजे कार्यकारी मंडळ, तिसरा न्यायपालिका म्हणजेच न्यायालय आणि चौथा मीडिया किंवा प्रेस अर्थातच पत्रकारिता यांचा समावेश होतो. यात मीडिया म्हणजे प्रेस वगळता (लेखात पुढे याचा उल्लेख पत्रकारिता म्हणून करतोय) बाकीचे तीन आधारस्तंभ आर्थिक दृष्ट्या मजबूत आणि सुबत्तापूर्ण आहेत. परंतु पत्रकारिता हा आधारस्तंभ मात्र देशाला स्वातंत्र्य मिळून पाऊण शतकापेक्षा जास्त कालावधी उलटून गेला असला तरी अजूनही आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि मजबूत होऊ शकलेला नाही याचे कारण म्हणजे या आधारस्तंभाला चालविण्यासाठी जो आर्थिक खर्च लागतो तो शासनाकडून येत नाही.

जसे संसद चालविण्यासाठी, सरकार चालविण्यासाठी, न्यायपालिका चालविण्यासाठी, या क्षेत्रात जे-जे लोक कार्यरत आहेत किंवा कार्य करतात त्या सर्वांचे मानधन म्हणा किंवा वेतन म्हणा ते शासनाकडून देण्यात येते. मात्र पत्रकारिता क्षेत्र चालविण्यासाठी किंवा टिकविण्यासाठी बाकीच्या तीन आधारस्तंभासारखा सरसकट भार शासनाकडून उचलला जात नाही. नाही म्हणायला काही वृत्तपत्रांना शासनाकडून दरवर्षी काही ठराविक जाहिराती दिल्या जातात तर अधिस्वीकृती धारक पत्रकारांना मानधन ही मिळते परंतु ही संख्या अगदीच तुरळक म्हणजेच हाताच्या बोटावर मोजता येईल अशी आहे. पुन्हा त्यातही शासनाने दर्जा पद्धती सुरू केली आहे. अ, ब, क, ड वगैरे. ज्या क्षेत्रात अशाप्रकारे दर्जा पद्धती असते तिथे आपोआपच एका क्षेत्रात असूनही कार्यरत असणाऱ्यांमध्ये न दिसणाऱ्या एक प्रकारच्या भिंती तयार होऊन एक दुसऱ्याला सहकार्य करण्याऐवजी एक दुसऱ्याशी स्पर्धा सुरू होते. यामुळे ते क्षेत्र खिळखिळे होते. अशाच प्रकारे ज्या पत्रकारिता क्षेत्राला लोकशाहीचा चौथा मजबूत आधारस्तंभ संबोधले जाते तो आधारस्तंभ आज खिळखिळा होऊ लागला आहे. या आधारस्तंभालाच आता आधार देण्याची वेळ आली आहे.

काय तर म्हणे पत्रकारिता हा उद्योग अथवा व्यवसाय नाही तर तो लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. आधारस्तंभ म्हणून पत्रकारिता क्षेत्राला वाऱ्यावर सोडण्यात आलेले आहे. या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संपादकाला तारेवरची कसरत करत आपले वृत्तपत्र चालवावे लागते. पत्रकारिता क्षेत्र वगळता इतर असे कोणतेही क्षेत्र नाही की जिथे निर्माण खर्च १ रुपया असेल तर ती वस्तू ४ आने किंवा १० पैशाला विकली जाते. फक्त पत्रकारिताच एकमेव असे क्षेत्र आहे, जिथे एक चार पाणी वृत्तपत्र तयार करण्यासाठी ५ ते ६ रुपयांचा खर्च येत असेल तरीही ते वृत्तपत्र तयार झाल्यानंतर त्याची किंमत ही २ रुपये असते. म्हणजेच एक ४ पाणी वृत्तपत्र जेव्हा वाचकाला विकले जाते, तेव्हा त्या प्रत्येक वृत्तपत्रामागे संपादकाला जवळपास ३ ते ४ रुपयांचा आर्थिक फटका बसतोच बसतो. म्हणून पत्रकारिता क्षेत्र हे आतबट्ट्याचा व्यवहार असलेले क्षेत्र आहे.

सुरुवातीच्या काळात पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेले संपादक किंवा इतर प्रतिनिधींना याचे काहीही वाटले नाही परंतु आता सध्याच्या काळात एका ऐवजी दोन, दोन ऐवजी चार, चार ऐवजी आठ अशाप्रकारे वृत्तपत्रांची संख्या वाढत गेली. त्या मानाने वृत्तपत्राच्या वाचक संख्येत वाढ झाली नाही. उलट गेल्या काही वर्षांपासून जे वृत्तपत्राचे वाचक होते, त्याच्यातूनही अनेक जण आता वृत्तपत्राऐवजी जवळ बाळगत असलेल्या अँड्रॉइड मोबाईल मधून सोशल मीडियावरील घडामोडी, ताज्या बातम्या, त्याही अत्यंत मोजक्या शब्दात येणाऱ्या पाहून किंवा फार झालं तर वाचून माहिती करून घेत आहेत. यामुळे छापील वृत्तपत्रांचा खप दिवसेंदिवस कमी कमी होत चालला आहे. भलेही सध्याच्या काळात वृत्तपत्रांची संख्या भरमसाठ प्रमाणात वाढली असली तरीही छापील अंकांची संख्या प्रचंड मोठ्या प्रमाणात कमी झालेली आहे. काही वृत्तपत्रे तर अशी आहेत जी मुद्रित न होता फक्त त्याचे पीडीएफ तयार करून सोशल मीडिया वरून सोडले जात आहेत. या प्रक्रियेतून संपादकांना कवडीची ही आर्थिक आवक होत नाहीये. तर मग अशाप्रकारे आपल्या वृत्तपत्राची पीडीएफ सोशल मीडियावर व्हायरल करून उपयोग काय? असा प्रश्नही सहजच निर्माण होतो. तर याचे असे आहे, एकाने सोशल मीडियावर टाकले आणि त्याची चर्चा वाचकांमध्ये होऊ लागली तर दुसऱ्याला ही वाटते की, आपण आपल्या वृत्तपत्राचे पीडीएफ सोशल मीडियावर न टाकल्याने आपण पत्रकारिता क्षेत्रात पिछाडीवर जाऊ. यामुळे आजमितीला जवळपास सर्वच स्थानिक आणि विभागीय वृत्तपत्रे ही पीडीएफ स्वरूपात सोशल मीडियावर येऊ लागली आहेत. या प्रक्रियेतून संपादकांना आर्थिक लाभ तर होत नाही हे निश्चित. मात्र याचा मोठा आर्थिक फटका स्थानिक वृत्तपत्रांना बसू लागला आहे. वृत्तपत्र विक्रेत्यांना बसू लागला आहे.



पूर्वी जिथे पहाटेपासून ते सकाळी दहा-अकरा वाजेपर्यंत प्रत्येक वृत्तपत्र विक्रेत्याच्या स्टॉलवरून जिथे हजारो वृत्तपत्रे विकली जात होती तिथे आज शेकडोने सुद्धा विकली जात नाहीये, ही वस्तुस्थिती आहे. यामुळे वृत्तपत्र विक्री करणारे विक्रेते सुद्धा आता दिवसेंदिवस या क्षेत्रातून काढता पाय घेऊ लागले आहेत. कारण त्यांना घर-प्रपंच चालविण्यासाठी आवश्यक असलेला खर्च वृत्तपत्र विकून निघेनासा झालाय. या सर्व वस्तुस्थितीमुळे स्थानिक वृत्तपत्रांची सर्वात जास्त वाईट अवस्था होऊ लागली आहे. विभागीय वृत्तपत्रांच्या विक्रीत सुद्धा भलेही मोठी घट झालेली असेल परंतु शासन दरबारी त्यांना देण्यात आलेले अ गट या क्रमवारीमुळे त्यांचे भाव वाचकांच्या नजरेत आपोआप वाढते. ज्यामुळे शासनाकडून तसेच राजकीय नेते, पुढारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि खाजगी उद्योग करणारे व्यावसायिक यांच्याकडून त्यांना चांगल्याप्रकारे जाहिराती मिळतात. त्यांच्या जाहिरातींचे दरही स्थानिक वृत्तपत्रांच्या दरापेक्षा कित्येक पटीने जास्त असते. यामुळे अ गटात असलेल्या विभागीय वृत्तपत्रांना आर्थिक झळ सोसावी लागत नाहीये. विभागीय वृत्तपत्रांकडे आर्थिक आवक चांगली असल्याने त्यांच्याकडे कर्तव्यावर ठेवलेले कार्यकारी संपादक, उपसंपादक, वार्ताहर, छायाचित्रकार, संगणक तज्ञ, छपाई मशीन तज्ञ यांना स्थानिक वृत्तपत्रांच्या मानाने चांगले मानधन किंवा वेतन दिले जाते परंतु याव्यतिरिक्त जी वृत्तपत्रे ब, क किंवा ड या श्रेणीत येतात त्यांचे काय? त्यांच्यासोबत जुळलेल्या प्रत्येकाला अत्यंत तुटपुंज्या अशा मानधन म्हणा किंवा वेतन म्हणा काम करावे लागते त्याचे काय? असा प्रश्न ना शासनाला पडतो ना प्रशासनाला. यामुळेच लोकशाहीचा हा चौथा आधारस्तंभ म्हटला जाणारा स्तंभ वाऱ्यावर झुलू लागलाय. हा आधारस्तंभ पडला नाही पाहिजे, त्याला सांभाळायला हवे.

पत्रकारिता क्षेत्रातील कार्य म्हणजे पाण्यावरील बुडबुड्यासारखे आहे. लोकशाहीच्या या चौथ्या आधारस्तंभ म्हटल्या जाणाऱ्या क्षेत्रात येणारे संपादक, कार्यकारी संपादक, उपसंपादक, पत्रकार, छायाचित्रकार, संगणक तज्ञ, छपाई मशीन तज्ञ, वृत्तपत्र विक्रेते, घरोघरी वृत्तपत्रे टाकणारी मुले यापैकी कुणालाच शाश्वत आर्थिक स्थैर्य कधीच मिळत नाही. तसेच संपादक वगळता बाकीच्या कर्मींनी कितीही चांगले काम केले तरी ते एका वृत्तपत्रात किती काळ टिकतील हेही काही सांगता येत नाही. कारण सोबत जोडून घेतलेल्या व्यक्तीचे म्हणजेच पदाधिकारीचे आणि संपादकाचे सूर किती आणि कुठपर्यंत जुळतील याचा कुठलाही नेम नसतो. काही जणांचे असे काही सूर जुळतात की, ते अनेक वर्ष एकाच वृत्तपत्रात कर्तव्य बजावतात परंतु कुठेतरी माशी शिंकते आणि वर्षानुवर्षे वृत्तपत्रात सोबत राहिल्यानंतरही उचल बांगडी करण्यात येते. तर काहीजण असेही असतात की, दर वर्ष, दोन वर्षाला वृत्तपत्र सोडून जातात किंवा वृत्तपत्राचे संपादक त्यांना काढून टाकतात. ही सर्व परिस्थिती पाहता कोणत्याही वृत्तपत्रात आणि कोणत्याही संपादकासोबत व्यक्ती जुळल्यानंतर तो किती दिवस सोबत राहील किंवा त्याला किती दिवस सोबत ठेवले जाईल हे दस्तूरखुद्द संपादक सुद्धा सांगू शकत नाही. अशा प्रकारची अनिश्चितता वृत्तपत्र क्षेत्रात आहे. यामुळे वृत्तपत्र क्षेत्र हे पाण्याच्या बुडबुड्यासारखेच आहे. जे कधी निर्माण होतील आणि कधी फुटून जातील ते सांगता येत नाही. म्हणून या सर्व बाबी पाहता वृत्तपत्र क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अस्थिरता असल्याचे खेदाने नमूद करावेसे वाटते. वृत्तपत्र क्षेत्रातील ही अस्थिरता संपविण्यासाठी स्थिरता मिळवून देण्यासाठी लोकशाहीत असलेल्या इतर तीन आधारस्तंभासारख्या पत्रकारिता क्षेत्राला सुद्धा शासनाचे सबळ आर्थिक पाठबळ मिळणे, शासनाकडून वृत्तपत्राची अ, ब, क, ड अशी करण्यात आलेली वर्गवारी बंद करणे, वृत्तपत्र क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रत्येकाला शासन नियमानुसार मानधन म्हणा किंवा वेतन म्हणा मिळणे, प्रत्येक वृत्तपत्राच्या प्रत्येक प्रतिनिधीला अधिस्वीकृती मिळणे अत्यावश्यक आहे, अन्यथा पत्रकारिता क्षेत्रातील अस्थिरता ही दिवसेंदिवस वाढत जाईल आणि या क्षेत्राला अच्छे दिन येण्याऐवजी सध्या आहे त्यापेक्षा अजून बुरे दिन येतील हे नक्की....!

लेखन - एस.एम.युसूफ़ (मुक्त पत्रकार)
आसेफ़नगर, बीड
संपर्क - ९०२१ ०२ ३१२१

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी शिक्षक पदी निकिता राम अडागळे यांची निवड



## सिरसदेवी ग्रामस्थ्यांच्या वतीने निकिता अडागळे यांचा सत्कार

सिरसदेवी (प्रतिनिधी)


गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथील जिल्हा परिषद शाळा अडागळे वस्तीवर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतर्गत जिल्हा परिषद शाळेत निकिता राम अडागळे यांची प्रशिक्षनार्थी ट्रेनीं म्हणून शिक्षकपदी सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली. यावेळी निकिता अडागळे यांचा सत्कार शालेय शिक्षण समिती व अडागळे वस्तीवरील ग्रामस्थ्यांच्या वतीने करण्यात आला.

यावेळी सिरसदेवी ग्रामपंचायत चे सदस्य राहुल अडागळे, पत्रकार शाम अडागळे,शालेय समितीचे अध्यक्ष मनीषा बाळासाहेब अडागळे, शाळेचे मुख्याध्यापक अयुब शेख, राजू अडागळे, बाळासाहेब अडागळे, पिनू अडागळे, शरद अडागळे, शंकर अडागळे, आकाश अडागळे, पंचायत समिती सदस्य जगन अडागळे, लखन अडागळे, अमर शेख,दत्ता वेताळ, सचिन अडागळे यांच्या सहा प्रतिष्टीत नागरिक, पालक वर्ग तसेच ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

# नुस्कानग्रस्त शेतकऱ्यांना व नागरिकांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी : विकास गायकवाड

गेवराई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात दोन दिवसापासून होत असलेल्या संततधार पावसामुळे. शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्यांचे अतोनात नुकसान झाले आहे हाता तोंडाशीआलेल्या पिकाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे यामध्ये खरीपाचे कापूस सोयाबीन कांदा तुर फळबाग व भाजीपाला इत्यादी मालाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे आधीच शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी बांधवांना अजून सुद्धा २०२० चा पिक विमा पासून वंचित रहावे लागले आधीच अडचणी सापडलेला शेतकरी बांधवांना सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण पिक पाण्यात . गेल्याशिवाय राहणार नाही यांची भीती वाटु लागली आहे त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे शेतकऱ्यांना चालू वर्षाचा पिक विमा देण्यात यावा व सर्व शेतकरी बांधवांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावे.अन्यथा बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना सोबत घेऊन महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष च्या वतीने संविधानिक मार्गाने तीव्र आंदोलन छेडू असा इशारा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे



# नवनाथ शेकडे यांचे उपचार दरम्यान दुःखत निधन



आष्टी (प्रतिनिधी)

तालुक्यातील म्हसोबावाडी येथील नवनाथ शेकडे हे भाजपाचे सोशल मीडिया आष्टी तालुका अध्यक्ष होते त्यांची तब्येत बिघडल्याकारणाने त्यांच्यावर अहिल्यानगर येथे साई एशियन या हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते रात्री अचानक त्यांची प्रकृती ढासळल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला त्यांच्या पाश्चात्य वडिल म्हतारदेव व आई बबई शेकडे असा परिवार आहे हे नवनाथ शेकडे हे एकुलते एक होते या घटनेने म्हसोबावाडी व पंचक्रोशीतुन हळहळ व्यक्त होत आहे.

# आरोपी अद्याप फरार का?; बदलापूर घटनेवरुन हायकोर्टाचे पोलिसांवर ताशेरे, मीरा बोरवणकरांचा उल्लेख



मुंबई : पश्चिम बंगालमधील कोलकाता आणि राज्यातील बदलापूरच्या घटनेनंतर देशभरात तीव्र संतापाची लाट उसळल्याचं पाहायला मिळालं होतं. त्यानंतर, पश्चिम बंगाल सरकारने आज विधानसभेत अँटी रेप विधेयक मंजूर केले आहे. दुसरीकडे मुंबई उच्च न्यायालयाने बदलापूर बाल लैंगिक अत्याचाराच्या घटनेवरुन राज्य सरकारला फटकारलं आहे. बदलापूर प्रकरणावरून हायकोर्टानं दाखल केलेल्या सुमोटो याचिकेवर आज उच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने ही घटना गंभीरतेनं न घेत, निष्काळजी कारभार करणाऱ्या बदलापूर पोलिसांच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, या प्रकरणातील आरोपी अद्यापही फरार असल्याचा मुद्दा उपस्थित करत पोलिसांना चांगलंच सुनावलं आहे.

# आई आणि पत्नी सह ग्रामपंचायत सदस्य महिलांना कोणी अपशब्द वापरले तर मी खपवून घेणार नाही - सुशील सोळंके

माजलगाव (प्रतिनिधी)

तालुक्यातील सादोळा येथील ग्रामपंचायत काराभरावरून काल मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे यात सुशील सोळंके यांच्या सह काही जनावर माजलागाव शहर पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे या वरून सुशील सोळंके यांनी गावातील अशोक सोळंके यांच्या विरोधात उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कडे तकरार देऊन कायदेशीर कार्यवाहीची मागणी करत जर कोणी आमच्या आई ,पत्नी व ग्रामपंचायत महिला सदस्या विरोधात अपशब्द वापरत असेल तर मी कदापि खपऊन घेणार नाही असे सुशील सोळंके यांचे म्हणणे आहे

सुशील सोळंके यांनी सदरील प्रकरणी दिलेल्या अर्जात म्हंटले आहे की, माझी आई सन २०२२-२७ या कालावधी करीता सार्वत्रिक ग्रा.पं. निवडणुक सादोळा येथून जनतेतून सरपंच म्हणून निवडुन आलेली आहे. सदर ग्रा.पं.चे सरपंच व इतर आकरा सदस्यांची सादोळा ग्रा.पं.असून त्यापैकी दहा सदस्य व सरपंच ह्या सर्व महिला आहेत. सन २०२३ चे महिला सरपंच माझी आई यांनी स्वखर्चाने ग्रा.पं. मधील महिला ग्रामसेवक, सर्व महिला सदस्य व गावातील इतर महिला यांना आदर्श ग्रा.पं.चे गावे भेटीसाठी घेवून गेल्या होत्या. सदर भेटी दरम्यान येणारे देवस्थानचे दर्शन देखील त्यांनी नियोजीत केले होते. त्याच अनुषंगाने सन २०२४ ला देखील गावातील महिला सरपंच माझी आई यांनी त्यांना शासनाद्वारे आलेल्या मानधनातून स्वतः माझी आई, माझी पत्नी, महिला सदस्य व इतर महिला यांना इतर राज्यातील आदर्श ग्रामपंचायतीचे भेटीसाठी व जितिरुपती दर्शनचे नियोजन केले होते. दि.२९/०८/२०२४ रोजी रात्री ९.३० वा.दरम्यान आमचे गावातील अशोक बालासाहेब सोळंके यांना या नियोजीत दौऱ्याबाबत माहिती झाल्याने त्याने अशोक जिजाभाऊ गोजे यास गावातील नवीन बसस्थानका समोर आवाज देवून बोलावून घेतले व म्हणाला की, या वर्षी महिला सदस्या कुठे कुठे फिरायला जाणार आहेत, गेल्या वर्षीचा दौरा आदर्श ग्रा.पं. भेटीचा सांगून सरपंचाने गोव्याला फिरायला तुझ्या पत्नीस नेले त्या ठिकाणी त्यांनी कोणत्या प्रकारे अश्लील फोटो काढलेत ते फोटो मी पाहिलेत या वर्षी देखील तु तुझ्या पत्नीस व इतर महिला



सदस्यांना सरपंचासोबत गोव्यालाच पाठविणार आहेस का? असे अशोक सोळंके याने अशोक गोजे यास चार चौघात म्हणून त्याने अशोक गोजे यांचे पत्नीबाबत आक्षेपार्ह, घाणेरड्या व अश्लील भाषेत अपशब्द बोलून माझी आई, पत्नी व इतर ग्रा.पं. महिला सदस्यांची चारचौघात बदनामी केली त्याबाबत अशोक गोजे याने अशोक सोळंके यास असे अपशब्द बोलू नका, चुकीची, खोटी माहिती गावात प्रसारीत करू नका जेणेकरून आमची गावात असलेली चांगली प्रतिष्ठा मलीन होवून गावात अशांतता निर्माण होईल अशी विनंती केली असता त्याने अशोक गोजे यास अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली व तुला काय करायचे ते कर तु माझे काही वाकडे करू शकत नाहीस असे म्हणाला त्यावेळी जवळच असलेले भगवान शेषेराव सोळंके व सुनिल आसाराम सोळंके यांनी अशोक बालासाहेब सोळंके यास समजावून सांगून खोटी बदनामी करू नका अशी समज दिली व अशोक गोजे त्या ठिकाणाहून घरी निघून जाण्याचे सांगितले.

दि.३१/०८/२०२४ रोजी दुपारी २.०० वा. गावातील काही लोकांकडून अशोक गोजे याचे कानावर पुन्हा अशोक बालासाहेब सोळंके यांनी त्याचे पत्नीची व ग्रा.पं. महिला सदस्यांची बदनामी केल्याबाबत कानावर आले. त्यामुळे अशोक गोजे हा माझ्याकडे माजलगाव येथे आला व मला वरील सर्व घटनाक्रम सांगितला. त्यावरून मी अशोक गोजे यास सांगितले की, सदर भेटी दौऱ्यात माझी आई व पत्नी ह्या देखील प्रत्यक्ष होत्या त्या केवळ आदर्श ग्रा.पं.भेटीसाठीच गेलेल्या होत्या, अशोक सोळंके याने काही सांगितले आहे ते साफ खोटे, चुकीचे व वस्तुस्थितीविरुध्द आहे, याबाबत माझे पत्नीचे मोबाईलमधील दौऱ्याचे छायाचित्रे अशोक गोजे यांना दाखवली व आपण

अशोक सोळंके यांचे कडे जावून याबाबत लागलीच विचारणा करूत असे म्हणून मी, पत्नी वैशाली साळुंके व अशोक गोजे असे अशोक सोळंके यांचे माजलगाव येथील दुकानात गेलोत. त्या ठिकाणी अशोक सोळंके यांना आम्ही सर्वांनी वरील खोट्या बदनामी का करतात, सदर दौऱ्याच्या छायाचित्रे पाहा व सांगा आम्ही कोठे गेलो होतोत, याबाबतची खरी माहिती आपण मोहनराव काका व गावकऱ्यांना सांगूत तु आमचे सोबत चल असे म्हणालो असता अशोक सोळंके याने पुन्हा माझ्या आई व पत्नी बद्दल अर्वाच्च भाषा वापरु लागला व मी कोणाकडेही येणार नाही असे म्हणून तुझ्या कुटूंबाची व ग्रा.पं.ची यापुढे जास्तच बदनामी करणार असे म्हणाऱ्या अशोक सोळंके यांच्या विरोधात असा अर्ज सुशील सोळंके यांनी येथील उप विभाग पोलीस अधिकारी यांना दिला आहे जर माझ्या आई ची , पत्नीची व महिला ग्रामपंचायत सदस्यांची कोणी अश्लील भाषा वापरत असेल तर मी खपवून घेणार नाही असे ही सुशील सोळंके यांनी बोलून दाखवले

## बीड तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत जाहीर करा–विवेक कुचेकर

बीड (प्रतिनिधी)

दोन दिवसापासून मुसळधार पावसाने बीड तालुक्यात थैमान घातले असल्याने लाखो शेतकऱ्याचे नुस्कान झाले आहे. बीड तालुक्यात ओला दुष्काळ जाहिर करून आर्थिक मदत करण्याची मागणी बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे केली असल्याची माहीती बालाघाटावरील सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर एका निवेदनाद्वारे बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

बीड तालुक्यासह बालाघाटावर दि.१ सप्टेंबर रोजी प्रचंड मोठी अतिवृष्टी झाली. वादळी वाऱ्यासह जोरदार झालेल्या पावसामुळे नदी-नाल्यांना महापुर आला आहे.या पावसाने शेतकरी बांधवांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून.सोयाबिन,तूर,मुग,उडीद, कापूस इत्यादी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.तसेच शहरासह ग्रामीण भागातील अनेक लोकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांची घरे पडली असून संसार उघड्यावर आला आहे.काहींच्या दुकानात आणि घरात पाणी शिरल्याने अनेक मौल्यवान वस्तू खराब झाल्या आहेत.

तसेच अनेक ठिकाणी मूकी जनावरे वाहून गेले आहेत.उभी पिके वाहून गेली असल्याने हाता तोंडाला आलेला घास हिरावला गेला आहे.जमिनी खरडून गेल्याने पावसाचा मोठा फटका बसला आहे.तसेच अनेक ठिकाणी दोन गावांना जोडणारा नदी नाल्यावरील पूल वाहून गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्याचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. जिल्हाप्रशासनाने तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत करावे असे आवाहान बालाघाटावरील सामाजिक



कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी बीड जिल्हाधिकारी यांना एका निवेदनाद्वारे केले आहे.



## खेर्डावाडी येथे बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा

टाकरवन (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील खेर्डावाडी येथे सर्जा राजाचा बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बैलपोळा हा सण श्रावण, भाद्रपद अमोशा या तिथीला प्रदेशानुसार महाराष्ट्रासह देशभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणारा बैलपोळा सण. भारत हा कृषिप्रधान देश आहे. सर्व शेती ही शेतकऱ्यांचा जिवलग सर्जा राजा यांच्या खांद्यावर वर्षभर शेतकरी आपली शेती कसत असतो. पोळा सणाला फार महत्त्व आहे. कृषिप्रधान ग्रामीण संस्कृतीत बैलांचे पूजन करणारा हा अत्यंत महत्त्वाचा सण समजला जातो. बैलांचा साज, शृंगार करीत बैलांना गोडधोड जेवण घालून मिरवणुकीत मिरवल्या जातात. हा सण प्रत्येक शेतकरी बांधव आवर्जून साजरा करतो, बैला प्रति कृतज्ञता व्यक्त करणारा हा सण महाराष्ट्र सह देशभरात प्रत्येक शेतकरी बंधू साजरा करतो, पोळ्याच्या दिवशी सर्व शेतकरी बांधव आपल्या सर्जा राजाला मोठ्या उत्साहात गावांमध्ये मिरवणुक काढून बैल पोळा सण मोठ्या आनंद उत्सव साजरा करतो.

## शेतकऱ्यांनी पीक नुकसानीच्या तक्रारी क्रॉप इंन्शुरन्स प वर तात्काळ नोंदवाव्यात – प्रा.ईश्वर मुंडे

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

मागील तीन दिवसापासून राज्यासह बीड जिल्हयात संततधार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली पीके अतिवृष्टीने गेलेली आहेत. या नुकसानीचे पंचनामे महसूल यंत्रणेमार्फत होतीलच परंतू पीक वीमा कंपनीच्या अटी नुसार चोवीस तासांच्या आत या नुकसानीची तक्रार फोटोसह क्रॉप



इंन्शुरन्स प वर करणे आवश्यक आहे.तरी सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या तक्रारी सदरील प वर नोंदवाव्यात असे अवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी केले आहे. या बाबतच्या अडचणी व अधीक माहीतीसाठी ९०९६६८८३६५ या क्रमांकावर संपर्क साधावा.



आमचे परममित्र मार्गदर्शक महेश भैय्या धांडे यांचा वाढदिवस आनंदात साजरा करताना आम्ही सर्व मित्र परिवार

### मातंग समाजाने देवळी फुलगाव मतदार संघात

## कॉंग्रेस सोबत गजदारी करा सर्जेराव जाधव प्रदेश महामंत्री भारतीय जनता पार्टी

वर्धा (प्रतिनिधी)

देवळी-पुलगाव* विधानसभा मातंग समाज महामेळावा स्थानिक भोंग कार्यालय देवळी येथे,आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्धाटक माजी खासदार रामदासजी तडस, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रीय लहुशक्तीचे राष्ट्रीय अध्यक्ष परिमलदादा कांबळे, सत्कार मूर्ती मनून विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार श्री.अमीतजी गोरखे, व आमदार नामदेवराव ससाणे, तर प्रमुख अतिथी मनून सर्जेराव जाधव महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस भाजपा अनुसूचित जाती मोर्जा, तर स्वागताध्यक्ष मनून राजेशजी बकाने निवडणूक प्रमुख भाजपा देवळी पुलगाव विधानसभा स्वागत अध्यक्ष देवळी विधानसभा मतदारसंघामध्ये भरघोस मतांनी निवडून देण्याचे आवाहन देखील मातंग समाजाला सर्जेराव दादा जाधव यांनी केले , व विशेष अतिथी मनून प्रा. किरणजी उरकांदे राष्ट्रीय लहुशक्तीचे जिल्हा अध्यक्ष विलास डोंगरे, पंकज कांबळे, राजेश आहिव ,सुमनताई बावणे, संगीताताई वानखेडे दिलीप पोतफोडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांचे हस्थे दीपप्रज्वलन व महापुरुषांचे फोटो पूजन व हार अर्पण करण्यात आले.कार्यक्रमात आमदार गोरखे व आमदार ससाणे यांचा नागरी सत्कार करण्यात आला, तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा ही सत्कार करण्यात आला, मान्यवर मंडळीतील सर्व मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. परंतु




आमदार गोरखे व सर्जेराव जाधव यांनी, समाजाला उद्धेशित करतांना आर्टीचे निर्मिती अबकड वर्गीकरण, व इतर बाबीचे सखोल बाबी भाषण करून सांगितल्या, व मातंग समाजाला इमानदार म्हणून आतापर्यंत मातंग समाजाचा कॉंग्रेसचा वाल्यांनी व शरद पवारांनी वापरच करून घेतला भाजपा सरकारने क्रांतिवीर लहुजी साळवे यांचे स्मारक पुणे येथील सुरू करून त्याला निधी उपलब्ध करून दिला अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाला एक हजार कोटी रुपयांचे भाग भांडवल दिल पार्टीबद्दल पार्टी वेगळी केली आर टी च्या कार्यालयाचे उद्धाटन मुंबई येथे करण्यात आल्याने काम सुरू करण्यात आले अशा अनेक योजना व भारतीय जनता पार्टीच्या शिंदे सरकारच्या सरकारने मातंग समाजाच्या पाठीशी राहून खंबीरपणे साथ देण्याचे काम सुरू केलेलं आहे त्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या सरकारला व त्यांच्या उमेदवाराला भरघोस मतांनी निवडून द्या असेही सर्जेराव जाधव बोलले

भाजपा पक्ष हा मातंग समाजाचा विचार करतो. व आपल्या हक्क व आपल्याला न्याय देणारा पक्ष आहे.असे, ठणकावून सांगत.भाजपा चे सर्व उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी हि आता तुमचेवर आहे. व या विधानसभा क्षेत्रात पक्षाचा उमेदवार तुम्ही भरघोस मतांनी निवडून आनाल ही तुमचे कडून अशा बाळगतो.असे वक्तव्य सर्जेराव दादा जाधव यांनी आपल्या भाषणात,समाजाला मोलाचं मार्गदर्शन केले.ते पुढे म्हणाले की भारतीय जनता पार्टी आणि आघाडी सरकार सत्तेत मिळाल्यास मातंग समाजाला दिलेल्या सर्व योजना बंद ही होतील असेही ते पत्रकार परिषदेमध्ये पत्रकारांना बोलत होते

आरटीओ अजून पार्टी वेगळी केली अ ब कलाचा वर्गीकरण आणि दलितांना दिलेल्या सवलती वभाटा सरकार जर सत्तेत आलं तर बंद करेल त्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली भीती सरकारला निवडून द्यावा असेही त्यांनी समाजाला मार्गदर्शन केले समाजाने ज्वेलर्स करून स्वागत केले सर्जेराव जाधव यांच्या भाषणाचे

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विलास डोंगरे, तर सूत्रसंचालन प्रवीण डोंगरे व किशोर गव्हाळकर तर, आभार अशोक डोंगरे यांनी मानले, कार्यक्रमाचे मातंग समाजाच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रम

यशस्वीते केला अशोक डोंगरे, काजलसरा, उतम्म चव्हाण अशोक डोंगरे, सतीश गवळी, आकाश गवळी, अनिल वाघमारे, मनोहर डोंगरे,नितेश कांबळे,भानुदास कांबळे,रामाजी जाधव,आशाबाई वाघमारे,नामदेवराव शिखरे,भारत बावणे,मनोज गुडारे संतोष गवळी,उत्तम फुगे,अंबिका पोचपोटे,पुंडलिक पवार, रमेश पवार,सुधाकर पायघान,भगवान तीरले व इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले . कार्यक्रमात हजारो चे संख्येने समाज बांधव उपस्थित होते.



## कोल्हारवाडी येथे बैलपोळा उत्साहात साजरा

बीड पासून जवळच असलेल्या मौजे कोल्हारवाडी येथे बैलपोळा हा शेतकऱ्यांचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व गावकरी यांनी भव्य मिरवणूक काढली व मारुतीच्या मंदिरासमोर विधिवत पुजा करून बैलांचा विवाह लावण्यात आला , यावेळी डपडे व फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली ,गोरख अण्णा सिंघन यांच्या वतीने सर्व शेतकरी व बैल मालकांचा यथोचित सत्कार करुन सन्मान करण्यात आला यावर्षी पाऊसपाणी जोरात असल्याने शेतकरी आनंदात होता यावेळी बोलताना सिंघन अण्णा म्हणाले की,बैल आपल्या शेतात इमानदारीने कष्ट करित राबत असल्याने आपल्याला सर्वांना अन्न खायला मिळत आहे,व आपण जगत आहोत ,आपला भारत देश हा शेतीप्रधान देश आहे, शेतकऱ्यांना मी विनंती करतो की आपला बैल वयस्कर झाल्यावर त्याला कसायला विकू नका, माणसाप्रमाणे त्याचा अंत्यविधी केला पाहिजे,तसेच गाय ही गोमाता असुन आईप्रमाणे तिलाही जपल पाहिजे, यावेळी सर्व गावकरी व शेतकऱ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या, बैलपोळ्याला गावातील, शेतकरी,युवक, महिला भगिनी व अबालवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दादासाहेब फाळके चित्रपट संघटनेच्या महाराष्ट्र सचिव पदी प्रितम पवळ यांची निवड

आष्टी (प्रतिनिधी)

तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्रितम सोन्याबापू पवळ अर्थातच प्रेम कवी हे गेल्या आठ नऊ वर्षांपासून साहित्य क्षेत्रात जोमाने काम करतं आहेत पंतप्रधान, मुख्यमंत्री, राज्यमंत्री, आमदार, खासदार यांच्या हस्ते त्यांचा गुणगौरव देखील करण्यात आला आहे त्यांचे आजपर्यंत तीन काव्यसंग्रह व एक वात्रटिका संग्रह दिग्गज व्यक्तीच्या हस्ते प्रकाशित आहेत ते साहित्य क्षेत्राबरोबरच एक निर्भिड पत्रकार देखील आहेत याचीच दखल घेऊन त्यांना दादासाहेब फाळके चित्रपट युनियन यांच्याकडून महाराष्ट्र सचिव पदी निवड करण्यात आली

ही निवड संघटनेचे अखिल



भारतीय अध्यक्ष अजीत म्हामूनकर यांनी नियुक्तीपत्र दिले आहे. चित्रपट क्षेत्रात तरुण पीढीचे सकारात्मक विचार रुजावेत तसेच समाजप्रबोधनपर चित्रपट निर्माण व्हावेत या उद्देशाने संघटन वाढीसाठी प्रयत्नशील राहील या उद्देशाने आम्ही प्रयत्न करत आहोत असे अजित म्हामूनकर यांनी सांगितले.

## पालकमंत्री साहेब...जरा बीड शहराकडे लक्ष द्या :- शेख युनूस

बीड (प्रतिनिधी)

शहरातील एकही रस्ता नीट नाही, नाल्या नाही, वेळेवर पाणी नाही, आणि या दोन-तीन दिवसाच्या पावसाने तर पिण्याच्या पाण्याचे प्रश्न दूर झाले. पण गोरगरीब जनतेच्या घरात पाणी घुसले आहे. तेलगाव नाका, मोमीनपुरा , मोहम्मदीया कॉलनी, गजानन नगर अशा काही ठिकाणी रस्ते नाल्या नसल्यामुळे लोकांच्या घरात पाणी घुसत आहे.

व बीड शहराचे विद्यमान आमदार व भावी आमदारकीचे स्वप्न पाहणारे लोकांच्या समस्या दूर करण्याचे सोडून ,जल पूजन करण्यात मग्न आहेत.काम कमी देखावा जास्त करत आहेत. तरी माझी आपणास विनंती आहे की, आपण जसे शेती पिकाचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले. तसे शहराच्या विकासासंबंधी मा. जिल्हाधिकारी साहेब तसेच मुख्याधिकारी नगरपरिषद यांना सूचना द्याव्या. किंवा बीड शहराच्या विकासाबद्दल त्यांच्याशी बैठक घ्यावी. ही आपणास नम्र विनंती.



# गेवराई शहरांमध्ये तब्बल २० वर्षांनंतर साजरी होणार दहीहंडी

## सरपंच शितलताई साखरे यांच्या संकल्पनेतून आयोजन!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : धोंडराई गावच्या सरपंच कु. शितलताई साखरे यांच्या संकल्पनेतून गेवराई शहरांमध्ये तव्या २० वर्षांनंतर दहीहंडी उत्सव साजरा होणार आहे. या उत्सवाचे आयोजन शितलताई साखरे युवा मंच गेवराई यांच्याकडून करण्यात आले असून प्रमुख आकर्षक म्हणून सचिन नखडे मयुरी उत्तेकर कौस्तुभ गायकवाड यांची उपस्थिती राहणार आहेतसेच विजेत्या संघाचा सम्मान करून त्यांना बक्षिसे ही दिली जाणार

आहेत. हा भव्य दिव्य असा दहीहंडी उत्सव पाहण्यासाठी तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहण्याची आव्हान सरपंच कु. शितलताई साखरे युवा मंच यांच्याकडून करण्यात आले आहे.श्रावण महिन्यातील कृष्ण पक्षातील नवगी तिथीला दहीहंडीचा सण साजरा केला जातो. कृष्ण जन्माष्टमी किंवा गोकुळाष्टमीच्या एका दिवसानंतर येणारा हा सण भगवान कृष्णाच्या जन्माचे प्रतीक म्हणून या सणाचे महत्त्व



आहे दही हंडी हा देशभरात साजरा केला जाणारा एक प्रसिद्ध हिंदू सण आहे. महाराष्ट्र आणि गोव्यात हा दिवस दरवर्षी मोठया प्रमाणावर साजरा केला जातो हे कृष्ण जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी येते, ज्याला गोकुळाष्टमी असेही म्हणतात, जे भगवान कृष्णाच्या जन्माचे निरीक्षण करते. महाराष्ट्रात या कार्यक्रमाला गोपालकाला असेही म्हणतात. यावर्षी दहीहंडी मंगळवार, २७ ऑगस्ट रोजी आली होती तर जन्माष्टमी सोमवार, २६ ऑगस्ट रोजी होती. हा प्रसंग केवळ भगवान कृष्णाच्या आत्म्याचा उत्साही उत्सवच नाही तर सांधिक कार्याची आणि शारीरिक आव्हानाची परीक्षा देखील आहे. त्यामुळे या सणाला खूप महत्त्व आहे. गेवराई शहरांमध्ये पूर्वी खूप मोठ्या प्रमाणावर दहीहंडी उत्सव साजरा केला जात होता परंतु मधल्या काही काळात

हा उत्सव बंद पडला होता. आता धोंडराई गावच्या सरपंच कु. शितलताई साखरे यांच्या संकल्पनेतून गेवराई शहर मध्ये दहीहंडी उत्सव साजरा होत असून शितलताई साखरे बुवा मंच गेवराई यांच्याकडून या भव्य दिव्य दहीहंडी उत्सवाचे दि. ३ सप्टेंबर मंगळवार रोजी सायं. ५ वा. बाजार तळ पोलीस स्टेशन जवळ गेवराई येथे आयोजन करण्यात आला आहे. यावेळी प्रमुख आकर्षक म्हणून सचिन नरवडे मयुरी उत्तेकर कौस्तुभ गायकवाड यांची राहणार आहे

यावेळी विजेत्या प्रथम संघाला १.११.१११० बक्षीस तर व्दितीय संघाला ३३,३३३ रुबक्षी दिले जाणार असून राज्यातून जास्तीत जास्त दहीहंडी पथकाने सहभाग आपला सहभाग नोंदवावा व दहीहंडी उत्सवाचा लाभ घेऊन दहीहंडी पाहण्यासाठी मोठी गर्दी करावी असे आव्हान सरपंच कु. शितलताई साखरे युवा मंच यांच्याकडून करण्यात आले आहे.

## जिल्ह्यातील पाच तालूक्यातील शेतकरी गटाना

# वृक्ष लागवडीसाठी मोफत फळांच्या रोपाचे वाटप

किल्लेधारूर / प्रतिनिधी

बीड जिल्यातील केज, धारूर,बीड, अंबाजोगाई व आष्टी तालुक्यातील सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेअंतर्गत आयोजित गट शेतीद्वारे आपले उत्पन्न वाढवणाऱ्या व खर्च कमी करणाऱ्या गटांना चालना देण्यासाठी पानी फाउंडेशन व सेट्रिज संस्थेअंतर्गत गट शेती करणाऱ्या ज्या गटानी खडे खोदले अशा पाच तालुक्यातील ३२ गटातील १७५ पेक्षा जास्त शेतकऱ्याना ८५०० रोपे लागवड करण्यासाठी वाटप करण्यात आल्याची माहीती विभागीय समन्वयक संतोष शिनगारे यानी दिली.

बीड जिल्यातील केज, धारूर,बीड, अंबाजोगाई व आष्टी तालुक्यातील सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेअंतर्गत आयोजित गट शेतीद्वारे आपले उत्पन्न वाढवणाऱ्या व खर्च कमी करणाऱ्या गटांना चालना देण्यासाठी पानी फाउंडेशन व सेट्रिज संस्थेअंतर्गत गट



शेती करणाऱ्या ज्या गटानी खडे खोदले अशा पाच तालुक्यातील ३२ गटातील १७५ पेक्षा जास्त शेतकऱ्याना ८५०० रोपे लागवड करण्यासाठी वाटप करण्यात आली आहेत.यामध्ये आंबा,चिकू,मोसंबी,संत्रा,लिंबू, सिताफळ, जांभूळ,पेरू इत्यादी फळाच्या रोपांचा समावेश करण्यात आलेला आहे.अशी माहिती पानी फाउंडेशनचे विभागीय समनव्यक संतोष शिनगारे यांनी दिली. शेतकऱ्यांना समृद्ध व आर्थिक दृष्टीने सक्षम करण्याचा हा एक छोटासा प्रयत्न सुरु आहे.गटाने योग्य नियोजन करून व्यवस्थित रोपाची लागवड करावी,कुजलेल्या शेणखत, लिंबाचा पाला, बायोमिक्स, गांडूळखत, ट्रायकोड्रामा याचा वापर करून खडा भुजवावा व रोप लागवड करावी असे अवाहन पानी फाऊंडेशन चे मास्टर प्रशिक्षक रवींद्र पोमने, विनोद ठोंबरे, सेट्रिज प्रतिनिधी चैतन्य जोशी, विवेक वानखेडे यांनी केले आहे



## डॉ.योगेश क्षीरसागरांनी बीड शहरातील नदीपात्रालगत भागाचा घेतला आढावा

बीड (प्रतिनिधी)

शहरातील चांदणी चौक परिसरातील दगडी पुलासह नदीपात्राजवळील भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२) सकाळी ११ वाजता भेट दिली. यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत पुरसदृश्य परिस्थितीचा आढावा घेतला.

गत ४८ तासापासून जिल्हाभरात संततधार पाऊस सुरू आहे. बिंदुसरा नदीपात्राजवळील भागाला पुराचा धोका निर्माण झालेला आहे. याबाबत नगरपरिषद प्रशासनाशी संवाद साधत आपत्कालीन व्यवस्थेची माहिती घेतली. तसेच, त्यांना नागरिकांच्या संपर्कात राहण्याच्या सूचना दिल्या. यावेळी ज्येष्ठ नेते सादेक जमा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष इक्बाल शेख, युवती जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे, सय्यद इलियास, बिभीषण लांडगे, सरपंच अमोल बागलाने, अशोक वाघमारे, विनोद हातागळे, माजेद कुरेशी, साजेद जागीरदार, ए.वन.मुजीब, अमर विद्यागर, शुभम कुलथे, राहुल शिंदे, ज्ञानेश्वर राऊत आदी उपस्थित होते. याप्रसंगी नगरपरिषदेचे कर्मचारी, पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# भीमनगर मधील नागरिकांचा पंधरा वर्षापासून पुलासाठी चालू असलेला संघर्ष कधी थांबणार

## आमदार संदीप क्षीरसागर यांनी पुला साठी ढीगभर नारळ फोडले त्याच काय?

### जीव धोक्यात घालून नागरिकांना करावा लागतो प्रवास!!

नाळवंडी । प्रतिनिधी

बीड शहरांपासून हाकेच्या अंतरावर असलेले नाळवंडी हे गाव,ह्या गावा लगत असलेले भीम नगर आणि लहुजी नगर या लोकांची अनेक वर्षापासून प्रस्थापितांना लोकप्रतिनिधींना एकच मागणी आहे ती म्हणजे दळणवळण साठी लागणाऱ्या पुलाची! पावसाच्या अतिवृष्टी मुळे दोन नदीचा संगम एकत्र होऊन ही भीमनगर मधील नदी जोरात वाहत असते त्या मुळे वाड्या वस्त्या,भीमनगर,लहुजी नगर येथे राहत असलेल्या शेकडो लोकांचा आणि गावचा संपर्क तुटला आहे.दैनंदिन जीवनामध्ये लागत




असलेल्या वस्तू ह्या केवळ गावा मधेच मिळतात, मंग हॉस्पिटल असेल,अजून बऱ्याच गोष्टी या सर्व गोष्टींसाठी येथील नागरिकांना जीव हातात घेऊन नदीच्या जीव स्वाधीन करून प्रवास करावा लागत आहे.अनेक वर्षापासून ह्या पुलाचा प्रश्न काही मिटता मिटेना,या पुलासाठी अनेक निवेदने देण्यात आले असून या कडे सर्वांचं दुर्लक्ष आहे,आमदार संदीप क्षीरसागर यांचे आवडीचे गाव म्हणजे नाळवंडी या गावात अनेक वेळा आमदार आले आहेत ते आल्यानंतर अनेक वेळा नागरिकांनी तोंडी,निवेदनाद्वारे,तसेच आमदारांना ती समस्या डोळ्यांनी दाखवली होती,मात्र अनेक वेळा आमदारांनी या पुलाच्या कामासाठी नारळ फोडले आहेत मात्र पुल काही झाला नाही,हा जीव जाणारा प्रवास करत असताना कुणास काही जीवित हानी झाली तर याला सर्वस्वी जबाबदार कोण असा प्रश्न या ठिकाणी निर्माण होताना दिसत आहे,जनतेला पुल पाहिजे पुल द्या,या वेळी विधानसभेला भावी आमदारांना या पाण्यातून प्रवास करावा लागणार आहे,या पुला साठी कोण आपली बाजी मारणार हे देखील महत्वाचे ठरणार आहे,कारण भीमनगर,लहुजी नगर,अनेक वाड्या वस्त्या येथे राहत असलेल्या लोकांचं म्हणण आहे जो आम्हाला पुल देईल त्याच्या सोबत आम्ही पूर्ण ताकतीने उभे राहू असे येथील नागरिकांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

# सरस्वती नदीच्या पुराचे पाणी शिरले नागरी वस्तीत

## अनेक कुटुंबाचे संसार पाण्यात
## परळी नगरपालिकेचा ढिसाळ कारभार उघड

परळी(प्रतिनिधी)

परळी शहरात दोन दिवसापासून सतदार पाऊस सुरू असल्याने शहरातून वाहत जाणारी सरस्वती नदीला पूर आला आहे, यामुळे शहरातील नदीकाठच्या अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरले आहे. त्यामध्ये रहमत नगर,इंदिरानगर, कीर्ती नगर,गंगासागर नगर, भोई गल्ली, खुदबे नगर, पेठ मोहल्ला या नदीकाठच्या सकल भागात घरात पाच फुटापर्यंत पाणी शिरले आहे. नगरपालिकेच्या ढिसाळ कामाची ही सर्वात मोठी पावती परळीकरांना मिळाली आहे. या भागातील नागरिकांनी प्रशासनाला संपर्क केला असता कोणी फोन उचलले नाहीत व मदत पाठवली नाही.



नदीपात्राचे पाणी वस्त्यांमध्ये शिरल्यामुळे नागरिक आपला जीव मुठीत घेऊन इतरांच्या बिल्डिंग वर आसरा घेत आहे.यामुळे शहरातील सरस्वती नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरले असून अनेक जणांचे संसार हे पाण्यात बुडाले आहेत. नगरपालिका प्रशासनाने या गोष्टीची खबरदारी म्हणून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देणे आवश्यक होते. परंतु तशा सूचना दिल्या गेल्या नाहीत. इंदिरानगर, कृष्णा नगर, कीर्ती नगर,गंगासागर नगर ,शनी मंदिर ,अम्बवेस, भोई गल्ली, गोपाळकृष्ण टॉकीज च्या पाठीमागे भाग,शनी मंदिर या पुराच्या पाण्याने जास्त प्रभावित झाले आहे.नाले सफाई ची मोहीम हाती घेण्यात आली होती का?अशी चर्चा आता जोर धरत आहे. आपातकालीन सेवा फक्त नवापूर दिसून येतआहे.

# पिक विमा पुर्वसुचनेसाठी दिलेला टोल फ्री १४४४७ लागतच नाही शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणार कशी?

## मुख्यमंत्री महोदयांच्या ई पिक पाहणी अट रद्द घोषणेचं काय झालं ; सरसकट नुकसान भरपाई द्यावी :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश (प्रतिनिधी)

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सोयाबीन व खरीप कांदा व ईतर पिकांचे नुकसान झालेल्या विमाधारक शेतक-यांनी घटना घडल्यापासुन ७२ तासांच्या आत विमा कंपनीस पिकांच्या नुकसानीबाबत सुचित करावे असे आवाहन तालुका कृषी अधिकारी बी.आर.गंडे यांनी केले आहे.प्ले स्टोअर वरून क्राप इन्शुरन्स अप डाऊनलोड करून तक्रार करावी तसेच १४४४७ या टोल फ्री क्रमांकावरून पिक विमा कंपनीकडे तक्रार करावी असे म्हटले आहे.मात्र दिलेला टोल फ्री क्रमांक लागत नसल्यामुळे नेमकं सरकारला आणि पिक विमा कंपन्यांना शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची नियत आहे का केवळ दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी केला आहे.

बीड जिल्ह्यात पावसाने धुमाकूळ घातला असुन सरासरी ९२ मिलिमीटरची पावसाची नोंद झालेली असुन ९ तालुक्यात आणि तब्बल ६१ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली असुन ३४ महसूल मंडळात १०० मिलिमीटर पेक्षा आधिक



पावसाची नोंद झालेली आहे.बीड तालुक्यातील लिंबागणेश महसूल मंडळात आठवडाभरात ३ वेळा अतिवृष्टी झाल्याची नोंद आहे. टोल फ्री क्रमांक लागत नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या असुन याची शहानिशा केली असता यात तथ्य आढळुन आल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले असुन कैफियत कोणाकडे मांडायची हा प्रश्न पडला आहे.

ई पिक पाहणीची किचकट अट रद्द करण्यात यावी अशी शेतकऱ्यांची प्रमुख मागणी असताना मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी परळी येथील कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ई पिक पाहणीअट रद्द केल्याची घोषणा केली होती.मात्र अजुन याचा शासन आदेश निघालेला नाही त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांच्या घोषणेचं काय झालं? असा प्रश्न शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे.बीड पावसाने हाहाकार मांडला असुन सर्वच तालुक्यांनी पावसाची वार्षिक सरासरी ओलांडली आहे. अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील सोयाबीन,कांद्यासह ईतर पिके वाया गेली असुन प्रशासनाने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# टाकरवन येथे अनेक दुकानांमध्ये शिरले पाणी तर शिवारातील पिके पाण्याखाली

टाकरवन (प्रतिनिधी)

मागील तिन दिवसापासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. या पावसाने टाकरवन शिवारातील पिके पाण्याखाली गेली आहे. खरिपातील कापूस व सोयाबीन चे प्रचंड नुकसान झाल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. टाकरवन परिसरातील अनेक दुकानांमध्ये सोमवारी पाणी शिरले त्यामुळे व्यवसायिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई देन्याची मागनी शेतकरी वर्गातुन केली जात आहे.

मागील तीन दिवसापासून म सळधार पाऊस पडत आहे या पावसानेनद्यांना पूर आलेला आहे. चोपड्याची वाडी टाकळगव्हाण तेपेनिमगाव पांढरवाडी गव्हाण सह गोदाकाठच्या अशा अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. टाकरवन शिवारातील शेतकय्रांचे खरीपातील कापुस सोयाबीन सह अन्य पिके पाण्याखाली गेल्याने प्रचंड नुकसान झाले. सोमवारी टाकरवन येथील अनेक दुकानात पाणी शिरल्याने व्यवसायिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक घरांची पडझड झाली आहे. पाण्याखाली गेलेल्या पिकांचे पंचनामे करून तात्काळ मदत देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यातून केली जात आहे.






बीड : एम आय एम पक्षाचे बिड जिल्हाध्यक्ष तथा एक समाजसेवक आ.ऍड.शेख शफीक भाऊ यांना सिटी ब्लड सेंटर येथे वाढदिवस साजरा करून पुढील जीवनासाठी वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना पेठ बिड चे युवा नेते भारत कांबळे,भैय्यासाहेब,सागर धनवे,कपिल,सिद्धार्थ जावळे यांच्या उपस्थिती शुभेच्छा दिल्या!


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT